# <u>सौर उर्जा - सूर्याची शक्ती</u>

आपल्याला तर माहितीच आहे की सूर्य आपल्यासाठी खूप महत्वाचा आहे. पृथ्वीवरचे सर्व वनस्पती आणि प्राणी सूर्यापासून उर्जा मिळवतात.



सूर्याची उर्जा आपल्या पर्यंत प्रकाश आणि उष्णतेच्या रूपाने पोहोचते. माणसाने हजारो वर्षे सूर्याच्या उष्णतेचा वापर केला आहे. आपण सूर्याच्या उष्णतेने कपडे वाळवू शकतो, पाणी गरम करू शकतो, अन्न शिजवू शकतो. तुम्ही कधी भिंग सूर्यप्रकाशात धरले आहे का? भिंग सूर्यप्रकाश एकत्र करून खूप उष्णता तयार करू शकते. त्यामुळे आग सुद्धा लागू शकते.

सोलर पनेल वापरून आपण वीज सुद्धा तयार करू शकतो. या विजेचा वापर करून आपण calculator पासून अगदी गाडी सुद्धा चालवू शकतो. पण मग आकाशात ढग आले तर काय करायचे? त्यासाठी सोलर पनेल मधून तयार झालेली वीज आपण साठवू शकतो. अशी साठवलेली वीज रात्री किंवा पावसाळ्यात वापरता येते.

अशी सौर ऊर्जेपासून वीज करायला माणसाने नुकतीच सुरुवात केली आहे. पण त्याच्या वापराला काहीच मर्यादा नाहीये. माणसाने आत्तापर्यंत पृथ्वीवर जेवढी उर्जा वापरली आहे, त्याच्यापेक्षा जास्त उर्जा तर सूर्य एका सेकंदात तयार करतो. विचार करा, जर का आपण ही सगळी उर्जा वापरू शकलो, तर काय होईल बरे?

- सुजित उपाध्ये (त्रिवेणी मराठी शाळा)

Unrestricted

१. या धड्यात खूप नवीन शब्द आहेत. खालील शब्दांचा उपयोग करून वाक्ये तयार करा.
उर्जा, वनस्पती, उष्णता, सूर्यप्रकाश, भिंग, वीज, मर्यादा

२. सूर्याची उर्जा आपण आणखी कश्या प्रकारे वापरू शकतो? दोन उदाहरणे लिहा.

३. सूर्याची उर्जा आपण आणखी जास्त वापरायला लागलो तर काय होऊ शकेल बरे?

Unrestricted